# अॅग्रोमेटअॅडवायझरी बुलेटीन
## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
## कृषि हवामानशास्त्र विभाग
## कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५

फोन : ०२०-२९५१६२६४

ई-मेल : amfupune@gmail.com


## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २२/०९/२०२६
## जिल्हा : जळगाव

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२२/०९/२०२६ ते २६/०९/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| पाऊस (मिमी) | 2.0 | 2.0 | 1.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.सें.) | 35 | 35 | 34 | 34 | 34 |
| किमान तापमान (अं.सें.) | 21 | 21 | 21 | 22 | 23 |
| ढग स्थिती (आकाश) | 3 | 4 | 3 | 2 | 2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 83 | 77 | 73 | 77 | 79 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 62 | 52 | 50 | 54 | 58 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 7 | 12 | 11 | 15 | 17 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 326 | 311 | 308 | 303 | 281 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २२, २३ व २४ सप्टेंबर, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून दिनांक २५ व २६ सप्टेंबर, २०२६ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.<br>इशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात<br>➢ दिनांक २४ व २५ सप्टेंबर, २०२६ रोजी जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक २७ सप्टेंबर, २०२६ ते ०३ ऑक्टोबर, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • सर्व उभ्या पिकांना ढगाळ हवामानामुळे किड व रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास फुले बायोमिक्स ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल अॅपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल अॅपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• शेतातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा.<br>• जिल्ह्यातील कोरडवाहू क्षेत्रात उपलब्ध ओलीवर रब्बी पिके जसे हरभरा, करडई आणि रब्बी ज्वारी पिकाच्या पेरणी चे नियोजन करावे.<br>• पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या धान्याची सुरक्षित ठिकाणी साठवण करावी.<br>• जोरदार वारा वाहण्याची शक्यता असल्यामुळे जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. |
| कापूस | बोंड धारणा अवस्था | रस शोषक किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी निंबोळी अर्क फवारणी सारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करावयात आणि प्रति एकर ८ ते १० पिवळे चिकट सापळे वापरा वेत. पांढरी माशीच्या नियंत्रणासाठी फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू. जी. २ ग्रॅम किंवा डायफेन्थुरॉन ५० डब्लु पी. १२ ग्रॅम किंवा बुप्रोफेझीन २५ एस.सी. २० मिली किंवा निंबोळी अर्क ५० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. पिक ८०-९० दिवसाचे झाले असल्यास पिकाचा मुख्य शेंडा खुडावा. फुल किंवा पाते गळ होत असेल तर नॅप्थालिक अॅसिड १०० मिली ५०० लिटर पाण्यात प्रती हेक्टरी फवारावे. डोंब कळया शोधून नष्ट कराव्यात. गुलाबी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी एकरी ३ ट्रायकोकार्ड लावावेत. गुलाबी बोड अळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी किडीच्या आर्थिक नुकसान पातळीनुसार लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ई.सी. ८ मिली किंवा स्पिनोसॅड ४५ एस.सी. ३.५ मिली किंवा प्रोफेनोफॉस ५० ई.सी. ३० मिली किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ एस.जी.४.४ ग्रॅम किंवा इन्डोक्झाकार्ब १४.५ एस.सी. १० मिली किंवा क्लोरेंनट्रानीलिप्रोल १८.५ एस.सी. ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून गरजेनुसार एका कीटकनाशकाची पावसाची उघडीप बघून फवारणी करावी . जोरदार वारे वाहण्याची शक्यता असल्याने रोगग्रस्त पाने, बोंडे, फुले गोळा करून नष्ट करावीत. |
| सोयाबीन | शेंगा भरण्याची अवस्था | ढगाळ हवामानामुळे रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी तसेच मावा किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी फ्लोनिकामिड ५०% डब्लू. जी. ४ ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणे पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. किडींची आर्थिक नुकसान पातळी पाहूनच फवारणी करावी. पिकातील मोठे तण काढून ध्यावे त्यामुळे किड व रोगाचे प्रमाण आटोक्यात ठेवण्यास मदत होईल. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी फ्ल्यूबेंडीअमाईड ३९.३५ % एस.सी., ३ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| **मुग/उडीद** | काढणी ते साठवणूक अवस्था | मुगाच्या शेंगा पक्व झाले असल्यास त्याची पहिली तोडणी करून घ्यावे व दुसरी तोडणी ८-१० दिवसांनी करावी. उडीद पक्व झाल्या असल्यास त्याची कापणी करून खळयावर वाळवून मळणी करून घ्यावी. पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाचे संरक्षित ठिकाणी वाळवून साठवणूक करावी. मुगाच्या शेंगा खळयावर चांगल्या वाळल्या असतील तर मळणी करून घ्यावी. साठवणुकीपूर्वी मुग व उडीद धान्य ४-५ दिवस चांगले उन्हात वाळवून सुरक्षित ठिकाणी साठवण करावी. |
| **भुईमूग** | शेंगा भरण्याची अवस्था | पिकातील मोठे तण काढून घ्यावे त्यामुळे किड व रोगाचे प्रमाण आटोक्यात ठेवण्यास मदत होईल. रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ८ ते १० पिवळे चिकट सापळे तसेच ८-१० कामगंध सापळे प्रति एकर लावावेत. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २ मिली प्रती लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. रस शोषणाऱ्या किडीं च्या नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रीड २ मिली प्रती १० प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **मका** | पक्वता अवस्था | किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ८-१० कामगंध सापळे प्रति एकर लावावेत. अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी स्पिनेटोरम ११.७ टक्के एससी ५ मिली किंवा ब्रोफ्लानिलाइड २० टक्के एससी २.५ मिली किंवा आयसोयायक्लोसेरॅम १८.१ एससी ६ मिली किंवा इमामेक्टिन बेंझोएट १.५ टक्के + प्रोफेनोफोस ३५ टक्के डब्लुडीजी १५ ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पक्व झालेल्या कणसांची काढणी करावी. |
| **वांगी** | पीक वाढीची अवस्था | रस शोषणाऱ्या (तुडतुडे) किडीच्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५% ई.सी.४ मिली किंवा फ्लोनीकॅमिड ५० टक्के डब्लु. जी. ४ ग्रॅम किंवा ॲफिडोपायरोपेन ५० डी.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | जोराचा वारा वाहण्याची शक्यता असल्यामुळे झाडांना आधार द्यावा. केळी पिल बागेत आता मोठ्या प्रमाणात करपा रोगाची लागण झालेली आहे , त्यासाठी शेतकऱ्यांनी मेटिरम + पायऱ्याक्लस्ट्रोबिन या संयुक्त बुरशीनाशकाची तीन ग्रॅम प्रति लिटर पाणी अधिक बॅनोले (मिनरल ऑइल) १०मिली प्रति लिटर किंवा Azoxystrobin + Difenconazole २मिली प्रति लिटर पाणी किंवा टेबुकनाझोल + ट्रीफ्लॉप झीस्ट्रोबिन ०.५ मिली प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. नवती बागेला कार्बेन्डाझिम १ ग्रॅम किंवा Tilt (Propiconazole) ०.५ मिली प्रति लीटर + मिनरल ऑइल १० मिली प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. सीएमव्ही या विषाणूजन्य रोग जळगाव जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी आढळून आला आहे, त्यासाठी शेतकऱ्यांनी रोगग्रस्त झाडे उपटून, ईमिडाक्लिप्रिड ०.५ मिली प्रति लिटर प्रमाणे फवारणी करावी. तसेच आता दोन दिवसांमध्ये जास्त पाऊस झाला आहे , जर कंदसड रोग दिसला तर त्या झाडाला चार ग्रॅम प्रति झाड प्रमाणे ब्लीचिंग पावडर बांगडी पद्धतीने देऊन नंतर पाणी द्यावे. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | वासरु जन्मल्यानंतर त्याच्या नाकातील कानांतील व तोंडातील सर्व चिकट पदार्थ लवकरात लवकर काढून वासरांना स्वच्छ करावे, नाळ आपोआप तुटली नसल्यास ती २ ते ३ सेंटिमीटर अंतराबर जंतुनाशकामध्ये भिजवलेल्या दोऱ्याने घट्टू बांधून त्यापुढील भाग निर्जंतूक केलेल्या कात्रीने कापावा. त्यानंतर त्या वर दिवसातून २ ते ३ वेळा निर्जंतुक द्रावण लावावे. वासरु जन्मल्यानंतर सुमारे एक तासाच्या आत त्याच्या वजनाच्या ८ ते १० टक्के चीक पाजावा. वासराचे शिंगे व कोवळे खूर वाढू नयेत म्हणून ७ ते १० दिवसांच्या आत तज्ज्ञांच्या सहकार्याने शिंगे व कोवळे खूर काढावीत. |

***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान : -**
**ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : २२.०९.२०२६**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**